<u>जाईची आवडती वेळ</u>

रात्री झोपायची वेळ जाईला खूप आवडते. दिवसाची कामे ती भराभर उरकते. रात्रीचे जेवण झाले की तिला छान वाटते. मग ती कपाटातून रात्रीचे कपडे काढते. ते कपडे घालते. दात घासते. तोंड धुते. मग पुस्तकांच्या कपाटातून पुस्तक घेते.

नंतर जाई बाबांना तिच्या खोलीत बोलावते. बाबा येतात. जाईच्या पलंगावर बसतात. जाई पुस्तक घेते. उशीवर डोके टेकते. उबदार रजईत जाते. बाबांना पुस्तक वाचून दाखवायला जाईला फार आवडते. वाचताना जाई पुस्तकातल्या माणसांचे आवाज काढते. कधी हळू आवाजात वाचते. तर कधी मोठ्या आवाजात वाचते. कधी एखादा शब्द अवघड असतो. मग बाबा तिला तो शब्द नीट सांगतात. त्या शब्दाचा अर्थही सांगतात.

जाई अर्धा तास पुस्तक वाचते. मग बाबा पुस्तकात खूण घालतात. जाईची गोड पापी घेतात. पुस्तक पुन्हा कपाटात जागेवर ठेवतात. जाईच्या खोलीतला दिवा विझवतात. बाबा त्यांच्या खोलीत जातात. जाईला गाढ झोप लागते.




~~~

1. वर्तमानकाळ: “रात्री झोपायची वेळ जाईला खूप <u>आवडते</u>.”

वर्तमानकाळातील आणखी चार वाक्ये शोधून त्यांच्याखाली --- अशी रेघ मारा.

तुमच्या मनाने दोन वाक्ये लिहा.

______________________________

______________________________

© Triveni Marathi Shala, Cincinnati, OH
~~~

2. भूतकाळ: “रात्री झोपायची वेळ जाईला खूप आवडत असे.”

धड्यातील कोणत्याही दोन वाक्ये भूतकाळात बदलून लिहा.

3. पुढील शब्द वापरून वाक्ये तयार करा - उरकणे, उबदार, अवघड, विझवणे, गाढ

4. तुमची दिवसातली आवडती वेळ कोणती आहे? का?

© Triveni Marathi Shala, Cincinnati, OH